सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२ वे, राजपत्र क्र. १६] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट १३-१९, २०२६ : श्रावण २२-२८, शके १९४८ [किंमत : ०.०० रुपये

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक–अ-छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याव्यतिरिक्त केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले व महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना)

**टीप :–**प्रत्येक अधिसूचनेच्या आधी मधोमध जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.

**१**

**आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांजकडून**

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण), नियम २०२१ मध्ये सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः छसंम-२०२४/प्र.क्र.०१ (भाग-२)/नवि-२४**

**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक :- २७.०७.२०२६**

**संदर्भ :-** १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. औमपा-२०१५ प्र.क्र.२१० (भाग-१)/नवि-२४ दि.१५.२.२०२१

२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. औमपा-२०१५/प्र.क्र.२१० (भाग-२)/नवि-२४ दि.२६.८.२०२१

३) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. औमपा-२०२३/प्र.क्र.०६/ नवि-२४ दि.१५.२.२०२३

४) आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांचे दि.९.७.२०२४ रोजीचे पत्र.

५) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१४६९, दि.९.७.२०२४.

६) नगर विकास विभाग, शासन निर्णय, छसंम-२०२४ प्र.क्र.०१ (भाग-१)/नवि-२४, दि.२७.७.२०२६

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र.१ येथील नगर विकास विभागाच्या दिनांक १५.२.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या एकूण ५७१६ पदांच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली असून संदर्भ क्र. २ येथील दि. २६.८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२१ नियम मंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील काही पदांच्या सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्यात आली आहे.

**२.** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकरिता मंजूर करण्यात आलेल्या आकृतीबंधामधून सफाई कामगारांची १३५ पदे कमी करुन मुकादमाची नवीन १३५ पदे निर्माण करणे तसेच काही पदांच्या सेवा प्रवेश नियमात सुधारणा करणेबाबत मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४६९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सेवा प्रवेश नियमात सुधारणा करणेबाबत शासनाची मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे.

**३. प्राप्त** प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णयान्वये महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधातील सफाई कामगार यांच्या मंजूर पदांपैकी १३५ पदे कमी करण्यात येवून मुकादम या पदनामाची १३५ नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मुकादम या नवीन पदाचे सेवा प्रवेश नियम विहीत करणेसह महानगरपालिकेमधील स्वच्छता निरीक्षक, क्रीडा अधिकारी, कनिष्ठ अभियंता, उद्यान सहाय्यक/कृषी सहाय्यक या पदाच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५४, ४५५, ४६५ (१) मधील तरतुदींनुसार सोप्रत जोडलेल्या परिशिष्ट **(२) अनुसूची** "ब" प्रमाणे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये मुकादम या नवीन पदाचे सेवा प्रवेश नियम निश्चित करण्यास आणि स्वच्छता निरीक्षक, क्रीडा अधिकारी, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल), कनिष्ठ अभियंता (विद्युत), उद्यान सहाय्यक/कृषी सहाय्यक या पदांच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये सुधारणा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**२.** या नियमांस "छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) सुधारणा नियम, २०२६" असे संबोधण्यात यावे.

**३.** सदर सुधारणा नियम आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी तात्काळ राजपत्रात प्रसिद्ध करावेत. हे नियम शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**४. सदर** शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०७२७१६२७४९८५२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**सोबत :- परिशिष्ट -(२) अनुसूची "ब"**

**(जयंत वाणी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

---

**शासन निर्णय क्रमांकः छसंम-२०२४/प्र.क्र.०१(भाग-२)/नवि-२४,**
**दि.२७.०७.२०२६ सोबतचे**
**परिशिष्ट-(२), अनुसूची-"ब"**

मुकादम (नवीन पद)

| | | सेवाप्रवेश नियम |
|---|---|---|
| **पदनाम व मंजूर पद संख्या** | **नेमणुकीची पद्धत व टक्केवारी (नामनिर्देशन/ पदोन्नती/ प्रतिनियुक्ती)** | **नेमणुकीकरिता अर्हता** |
| मुकादम गट-ड | पदोन्नती- १००% | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सफाई कामगार/ स्वीपर संवर्गातील किमान ०५ वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या व किमान एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण असणा-या कर्मचा-यांमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

सेवा प्रवेश नियमांमधील सुधारणा-

| सेवा प्रवेश नियमातील अ.क्र. | सध्याचे मंजूर सेवाप्रवेश नियम | | | सुधारित सेवाप्रवेश नियम | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पदनाम व मंजूर पदसंख्या | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी (नामनिर्देशन/ पदोन्नती/ प्रतिनियुक्ती) | नेमणुकीकरिता अर्हता | पदनाम व मंजूर पदसंख्या | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी (नामनिर्देशन/ पदोन्नती/ प्रतिनियुक्ती) | नेमणुकीकरिता अर्हता |

स्वच्छता निरीक्षक

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५० | स्वच्छता निरीक्षक | नामनिर्देशन ५०% | **अ**) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी, **ब**) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण. **क**) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | स्वच्छता निरीक्षक | नामनिर्देशन सरळसेवा ५०% | **अ**) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी, **ब**) स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण. **क**) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |
| | | खातेअंतर्गत परीक्षा नामनिर्देशना साठीची निवडीने ५०% | नामनिर्देशनासाठीची अर्हता धारण करणाऱ्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या चतुर्थ श्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून सरळसेवेने भरती करावयाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन निवड करता येईल. | स्वच्छता निरीक्षक | मर्यादित विभागीय परीक्षा निवडीने ५०% | महानगर पालिकेमध्ये स्वच्छता क्षेत्रामध्ये काम केल्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेल्या व सरळसेवा नियुक्तीसाठीची अर्हता धारण करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून मर्यादित विभागीय परिक्षेच्या माध्यमातून नियुक्ती देण्यात येईल. |

क्रीडा अधिकारी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९३ | क्रीडा अधिकारी | पदोन्नती १००% | औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक क्रीडा अधिकारी या पदावर किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | क्रीडा अधिकारी | पदोन्नती/ प्रतिनियुक्ती/ समायोजन | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक क्रीडा अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. पदोन्नतीने उमेदवार उपलब्ध न झाल्यास राज्य शासनाच्या क्रीडा विभागामध्ये किंवा इतर महानगरपालिकांमध्ये क्रीडा अधिकारी या पदावर कार्यरत असणाऱ्या, कोणत्याही खेळात विशेष प्राविण्य व प्रशिक्षणाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव असणा-या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्ती/ समायोजनाने नियुक्ती देता येईल. |

**कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन ७५% | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी<br>**ब)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन / सरळसेवा ७५% | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Civil) अभियांत्रिकी शाखेची पदवी<br>**ब)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>**क)** नियुक्तीनंतर विहीत संस्थेकडून घेतली जाणारी कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा पहील्या ०३ प्रयत्नांत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. विहीत संस्थेकडून घेतली जाणारी संबंधित प्रत्येक परीक्षा हा प्रयत्न म्हणून गणला जाईल. |
| | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | पदोन्नती २५% | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/अतिक्रमण निरीक्षक सवंर्गातील किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व कनिष्ठ अभियंता व्यावसायीक परीक्षा उत्तीर्ण असलेलया कर्मचा-यांमधुन सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | पदोन्नती २५% | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक / अतिक्रमण निरीक्षक पदाची विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक / अतिक्रमण निरीक्षक संवर्गातील किमान ३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांमधून सेवाज्येष्ठाता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. पदोन्नतीनंतर विहीत संस्थेकडून घेतली जाणारी कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा पहिल्या ०३ प्रयत्नांत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. विहीत संस्थेकडून घेतली जाणारी संबंधित प्रत्येक परीक्षा हा प्रयत्न म्हणून गणला जाईल. |

**कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल)**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २४ | कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) | नामनिर्देशन/सरळसेवा १००% | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी (मॅकेनिकल) अभियांत्रिकी शाखेची पदवी<br>**ब)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) | नामनिर्देशन / सरळसेवा ७५% | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची (मॅकेनिकल) अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>**ब)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>**क)** नियुक्तीनंतर विहीत संस्थेकडून घेतली जाणारी कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा पहिल्या ०३ प्रयत्नांत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. विहीत संस्थेकडून घेतली जाणारी संबंधित प्रत्येक परीक्षा हा प्रयत्न म्हणून गणला जाईल. |
| | — | — | — | कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) | पदोन्नती २५% | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मोटर मेकॅनिक पदाची विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व मोटर मेकॅनिक संवर्गातील किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. पदोन्नतीनंतर विहीत संस्थेकडून घेतली जाणारी कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा पहिल्या ०३ प्रयत्नांत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. विहित संस्थेकडून घेतली जाणारी संबंधित प्रत्येक परीक्षा हा प्रयत्न म्हणून गणला जाईल. |

कनिष्ठ अभियंता (विद्युत)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २८ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन / सरळसेवा १००% | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत (Electrial) अभियांत्रिकी शाखेची पदवी<br>**ब)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन / सरळसेवा ७५% | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य (Electrial) अभियांत्रिकी शाखेची पदवी<br>**ब)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>**क)** नियुक्तीनंतर विहीत संस्थेकडून घेतली जाणारी कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा पहील्या ०३ प्रयत्नांत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. विहीत संस्थेकडून घेतली जाणारी संबंधित प्रत्येक परीक्षा हा प्रयत्न म्हणून गणला जाईल. |
| | – | – | – | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | पदोन्नती २५% | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विद्युत पर्यवेक्षक पदाची विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व विद्युत पर्यवेक्षक संवर्गातील किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांमधून सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. पदोन्नतीनंतर पहिल्या ०३ प्रयत्नांत कनिष्ठ अभियंता व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. विहीत संस्थेकडून घेतली जाणारी संबंधित प्रत्येक परीक्षा हा प्रयत्न म्हणून गणला जाईल. |
| ५५ | उद्यान सहाय्यक/ कृषी सहाय्यक | नामनिर्देशन/ सरळसेवा १००% | **अ)** मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाची बी.एस्सी. (हॉर्टिकल्चर्स / ॲग्रीकल्वर/बॉटनी/ फॉरेस्ट्री) पदवी/ मान्याताप्राप्त विद्यापिठाची वनस्पती शास्त्रातील पदवी.<br>**ब)** शासकीय / निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडील कृषी उद्यान क्षेत्रातील उद्यान निरीक्षक<br>अथवा समकक्ष पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>**क)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | उद्यान सहाय्यक | नामनिर्देशन/ सरळसेवा ७५% | **अ)** मान्यताप्राप्त कृषी विद्यापीठाची बी.एस्सी. (हॉर्टिकल्चर्स/ ॲग्रीकल्वर/ बॉटनी/ फॉरेस्ट्री) पदवी/ मान्यता प्राप्त विद्यापिठाची वनस्पती शास्त्रातील पदवी.<br>**ब)** शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडील उद्यान क्षेत्रातील उद्यान निरीक्षक अथवा समकक्ष पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>**क)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उद्यान सहाय्यक | पदोन्नती २५% | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत प्रमुख माळी पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व कृषी/उद्यान विषयातील व्होकेशनल कोर्स पूर्ण केलेल्या किंवा माळी पदावर किमान १० वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व कृषी/उद्यान विषयातील व्होकेशनल कोर्स पूर्ण केलेल्या कर्मचा-यांमधुन सेवा ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

**(जयंत वाणी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR. SMT. MANISHA KUMBHAR